|| श्री गणेशाय नमः ||

# हरी ॐ धार्मिक पूजा विधी केंद्र

Astro • Puja • Vastu

ज्योतिष आणि वास्तु सल्लागार

## केशान्त

गुरुकुलात वेदाध्ययन पूर्ण केल्यानंतरआचार्यांच्या समक्ष हा संस्कार संपन्न केला जात असे. प्रत्यक्षात हा संस्कार गुरुकुलातून निरोप घेणे आणि गृहस्थाश्रमात प्रवेश करण्याचा उपक्रम आहे. वेद पुराण आणि विविधविषयांत पारंगत झाल्यानंतर ब्राम्हचाऱ्याच्या समावर्तन संस्काराच्या आधी केसांची सफाई केली जात असे आणि त्याला स्नान करवून स्नातक उपाधी दिली जात असे. केशान्त संस्कार शुभ मुहूर्तावर केला जात असे. गुरुकुलातून निरोप देण्याच्या आधी शिष्याचा समावर्तन संस्कार होत असे. या संस्काराच्या आधी शिष्याचा केशान्त संस्कार होत असे. मग त्याला स्नान घालण्यात येत असे. हे स्नान समावर्तन संस्काराच्या अंतर्गत होत असे. यामध्ये सुगंधी पदार्थ आणि औषधीयुक्त पाण्याने भरलेले वेदीच्या उत्तर भागात आठ घटांच्या पाण्याने स्नान करण्याचे विधान आहे. हे स्नान विशेष मंत्रांच्या उच्चारासोबत होत असे. यानंतर शिष्य पट्टा (मेखला) आणि दंड सोडून देत असे जे यज्ञोपविता सोबत धारण केलेले असत. या संस्कारानंतर त्याला आचार्य विद्या स्नातकाची पदवी देत असत. या उपाधी बरोबर तो सगर्व गृहस्थाश्रमात प्रवेश करण्यासाठी योग्य समाजाला जात असे. यावेळी तो सुंदर वस्त्र आणि आभूषणे धारण करत असे आणि आचार्य आणि गुरुजनांचे आशीर्वाद घेऊन आपल्या घरी जाण्यासाठी निरोप घेत असे. उपनयनामध्ये व्रत ग्रहण असते, तर समावर्तना मध्ये व्रत विसर्जन करावायचे असते.

ब्रह्मचर्याश्रम सोडून, गृहस्थाश्रम स्वीकारावयाचा आहे. या दोहों मधील आश्रमान्तराचा विधि समावर्तन संस्कारात आहे. मनुष्य कधीच निराश्रमि असू नये असे शास्त्र आहे. वेदाध्यन म्हणजे शिक्षण पूर्ण करुन पदवीधर होऊन आता तू गृहस्थाश्रम स्विकारणार आहेस, व्यवहार करणार आहेस, तू आता लोकांमध्ये जाणार आहेस. (पूर्वी वेदाध्ययन हे गुरुगृही व्हायचे ते समाजात राहून होत नसत, त्याला शांत निसर्गरम्य अशी ठिकाणे योजिलेली असायची, त्यामुळे एकाग्र बुद्धिने तो बालक अध्ययन करीत, आजची परिस्थिति मुलांच्या शिक्षणात किती अडचणी उपस्थित करीत आहे, आजचे ध्वनि प्रदूषण, त्यामुळे निसर्गाचा ह्रास, दूषित हवा, अन्न, पाणी, हे सर्व पाहिले म्हणजे पूर्वीची गुरुकुल शिक्षण पद्धति किती उत्तम होती हे आपल्या लक्षात येईल.) असो पुढे जाऊ, तर आता तू वेदशास्त्राचा अभ्यास करुन पदवीधर झाला आहेस, तेव्हा 'सत्यं वद । धर्मं चर। स्वाध्यायान्मा प्रमदः।

खरे बोल, धर्माचे आचरण कर, स्वकर्तव्याची जाणीव कायम ठेव. आणि प्रजातंतु तूटू देऊ नकोस असे सांगितले आहे, प्रजातंतु दोन प्रकारचे असतात. एक मुलगा होणे, व दुसरा म्हणजे शिष्य होणे. शिष्यपरंपरा ही सुद्धा प्रजातंतु आहे. प्रजातंतु तोडावयाचा नाही तर विवाह केला पाहिजे. म्हणजे विवाह संस्कार केला पाहिजे.


## HARI OM DHARMIK PUJA VIDHI KENDRA

योगेशशास्त्री ढवळे (गुरुजी) : 95944 28749 | निलेशशास्त्री ढवळे (गुरुजी) : 86524 02078

**SANPADA OFFICE**
Office No.8, 1st Flr, Shiva Triveni Galleria CHS.,
Plot No. 13, Sector 8, Sanpada, Navi Mumbai

**GOVANDI OFFICE**
Shri Swaybhu Hanuman Mandir, Deonar
Mahanagarpalika Vasahat, Govandi, Mumbai.

hariom astrologers | hariom astrologers | hariom_astrologers
hariomastrologers@gmail.com | www.hariomastrologers.com